सं.फौ.खटला क्र.२६०५/२०२४
शासन वि. हर्षद दत्ता ताळीकोटे
<u>निशाणी क्रमांक–१३</u>

| | | | |
|---|---|---|---|
| **दाखल दिनांक** | २१ | १० | २०२४ |
| **नोंदणी दिनांक** | २१ | १० | २०२४ |
| **निकाल दिनांक** | १८ | ०६ | २०२६ |
| **कालावधी** | **वर्षे** | **महिने** | **दिवस** |
| | **०१** | **०५** | **२७** |

| | |
|---|---|
| **MHYA050029712019** | **<u>पुसद येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्र.२ यांचे न्यायालयात</u>**<br>**(<u>पीठासीन अधिकारी – श्रीमती व्ही. डी. बिरहारी</u>)**<br>**–: <u>न्यायनिर्णय</u> :–**<br>(घोषित दिनांक १८.०६.२०२६)<br>सं.फौ.ख.क्र.२६०५/२०२४, ***<u>निशाणी क्रमांक–१३</u>***<br>गु.र.नं.५७५/२०२४ शहर पोलीस स्टेशन, पुसद |
| फिर्यादी | महाराष्ट्र शासन द्वारा<br>पोलीस निरीक्षक, शहर, पोलीस स्टेशन पुसद ता.पुसद जि. यवतमाळ |
| अभियोगपक्षातर्फे सहा सरकारी अभियोक्ता | श्री. के. ए. मुळे |
| आरोपी | **हर्षद दत्ता टाळीकोटे,**<br>वय – २६ वर्षे, व्यवसाय– मजुरी<br>रा.ग्राम काकडदाती, पुसद ता. पुसद, जि. यवतमाळ |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | अॅड. श्री.बी.एम.कपटे |

| **भाग–ब** | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | ०८.०८.२०२४ |
| पहिली खबर दिनांक | ०८.०८.२०२४ |
| दोषारोपपत्राचा दिनांक | २१.१०.२०२४ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | १५.०७.२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०२.०१.२०२६ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांक | निरंक |
| न्यायनिर्णय दिनांक | १८.०६.२०२६ |
| शिक्षा दिल्याची तारीख, आदेश | निर्दोष मुक्तता. |

## आरोपीचा तपशील

| आरोपीची श्रेणी | आरोपीचे नांव | अटक तारीख | जामीनवर सोडल्याची तारीख | अधिनियम | निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा | दिलेली शिक्षा | सुनावणीदरम्यान जेलमध्ये असल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | **दिली** | | **कलम ४२८ सी.आर.पी. सी.** |
| **१.** | **हर्षद दत्ता टाळीकोटे** | निरंक | निरंक | महाराष्ट्र/ मुंबई पोलीस कायदा कलम १२२ | निर्दोष मुक्त केले | निरंक | निरंक |

## भाग – क

## अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यादी / बचाव / न्यायालयाचे साक्षीदार

### अ. अभियोग

| अ.सा.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| अ.प.सा.क्रं.१ | धम्मदिप बंडु सुर्यवंशी | घटनास्थळ पंच | १३ |
| अ.प.सा.क्रं.२ | पो.कॉ. आकाश सुभाषराव | तपास अधिकारी | १३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | बाभुळकर | | |
| **बचावपक्ष साक्षीदार क्रमांक** | **नांव** | **पुराव्याचे स्वरुप प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार)** | **निशाणी क्रमांक** |
| निरंक | | | |
| **क. कोर्ट साक्षीदार, इतर** | | | |
| **कोर्ट साक्षीदार क्रमांक** | **नांव** | **पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार)** | **निशाणी क्रमांक** |
| निरंक | | | |

**<u>अभियोगपक्षाचे / बचाव / कोर्ट निशाणी</u>**

**अ.अभियोग**

| अनु. क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | पी.१/.पी.डब्ल्यु–१ | घटनास्थळ पंचनाम्यावरील सही |
| २ | पी.१/.पी.डब्ल्यु–२ | फिर्यादीची रिपोर्टवरील सही |
| ३ | पी.२/.पी.डब्ल्यु–२ | फिर्यादीची एफ.आय.आर वरील सही |

**ब. बचाव**

| अनु. क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| निरंक | | |

**क. कोर्ट निशाणी**

| अनु. क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| निरंक | | |

**ड. मुद्देमाल**

| अनु. क्र. | मुद्देमाल क्र. | तपशिल |
|---|---|---|
| निरंक | | |

## –: न्यायनिर्णय :–

## (घोषीत दिनांक १८ जुन, २०२६)

आरोपीविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १२२ अन्वये खटला चालविण्यात आला.

**अभियोगपक्षाचे थोडक्यात कथन खालील प्रमाणे –**

२. दिनांक ०८.०८.२०२४ रोजी फिर्यादी हे पोलीस स्टेशन परिसरात पेट्रोलिंग करीत असताना श्रीरामपुर रश्मी हॉटेल पुसद येथे रात्री २.३० वाजताच्या सुमारास सचिन कदम यांच्या हॉटेल जवळील गल्लीत एक ईसम त्यांना पाहून आपले अस्तित्व लपवुन संशयास्पद स्थितीत हेलमेट घालुन बसलेला होता. ते त्यांच्याजवळ गेले व त्यास पकडून त्याचे नाव गाव विचारले असता आरोपीने त्यांना उडवा उडवीचे उत्तरे देवून त्याचे नाव गाव सांगण्यास टाळाटाळ करु लागला. सदर आरोपी हा चोरी किंवा घरफोडी सारख्या दखलपात्र गुन्हे करण्याच्या इराद्याने बसलेला आढळुन आल्याने त्यावेळी दोन पंचाना बोलावुन त्यांच्यासमक्ष त्यास विश्वासात घेवुन नाव गाव विचारले तेव्हा त्याने त्याचे नाव हर्षद दत्ता टाळीकोटे असे सांगितले. आरोपीला त्यांनी तु लपुन का बसलेला आहे असे विचारले असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. आरोपीने सरळ व समाधानकारक एकही उत्तर दिले नाही. सदर आरोपी हा चोरी किंवा घरफोडी सारख्या दखलपात्र गुन्हे करण्याच्या ईराद्याने श्रीरामपुर पुसद येथील रश्मी हॉटेलच्या बाजुला कदम यांच्या हॉटेलच्या गल्लीत संशयास्पद स्थितीत मिळून आल्याने पोलीस ठाणे येथे आरोपीविरुद्ध गुन्हा क्र.५७५/२०२४ महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १२२ अन्वये नोंदविण्यात आला.

३. सदर गुन्हयाचा तपास पो.ह.वा.श्री.मनोज लक्ष्मण कदम, ब.नं.१४६३, यांच्याकडे सोपविण्यात आला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळास भेट देवुन घटनास्थळ–जप्ती पंचनामा तयार केला. आरोपीस फौ.प्र.सं.कलम ४१(अ) अन्वये नोटीस दिली.

साक्षीदारांचे बयाण नोंदविले. तपासाअंती आरोपीविरुद्ध सबळ पुरावा मिळून आल्याने तपास अंमलदाराचे मत झाल्यामुळे आरोपीविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

४. आरोपी न्यायालयात हजर झाल्यांनतर आरोपीविरुद्ध ***निशाणी क्रमांक–१३*** वर महाराष्ट्र पोलीस अधिनियम चे कलम १२२ अन्वये प्रतिकथन नोंदविण्यात आले. सदरचे प्रतिकथन आरोपीस त्याच्या भाषेत वाचुन व समजावुन सांगितला असता, त्याने गुन्हा कबुल न करता खटल्याची मागणी केली. आरोपीविरुद्ध दोषारोप पुर्णत: फेटाळुन संपरिक्षणाची तयारी दाखवली. संपरीक्षेदरम्यान नोंदविण्यात आलेल्या पुराव्याचा खुलासा करण्याकामी आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वये निवेदन ***निशाणी क्रमांक–१६*** वर नोंदविण्यात आले. आरोपीचे नोंदविण्यात आलेले निवेदन व खटल्यातील बचाव लक्षात घेता, त्यांनी त्यांच्या विरुद्ध खोटी केस दाखल केली आहे असा बचाव घेतला आहे. आरोपीने स्वतःला अथवा इतर कुठलाही साक्षीदार बचावकामी तपासलेला नाही.

५. अभियोगपक्षातर्फे सरकारी अभियोक्ता श्री.के.ए.मुळे व आरोपीतर्फे श्री.बी.एम.कपटे यांचा युक्तीवाद ऐकला. लेखी व मौखीक पुराव्याचे अवलोकन केले.

६. विचारासाठीचे मुद्दे व त्यावरील निष्कर्ष कारणासहीत खालील प्रमाणे देत आहे.

| अनु.क्रं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक ०८.०८.२०२४ रोजी रात्री २.३० वा. चे सुमारास | |

| | | |
|---|---|---|
| | आरोपी श्रीरामपुर रशमी हॉटेल पुसद येथील सचिन कदम यांच्या हॉटेल जवळील गल्लीत आरोपीने चोरी किंवा घरफोडी सारखा दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने रात्रीच्या अंधारात आपले अस्तित्व लपवून संशयितरित्या मोटारसायकलसह डोक्यात हेलमेट घालून वावरत असताना मिळून आला आणि त्यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १२२ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का? | **नकारार्थी** |
| २. | अंतिम आदेश काय ? | **आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्रमांक १ करीता</u> –**

७. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक–२ श्री.आकाश सुभाषराव बाभुळकर यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये असे कथन केले आहे की, दिनांक ०८.०८.२०२४ रोजी ते पोलीस कॉन्स्टेबल म्हणून शहर पोलीस स्टेशन, पुसद येथे कार्यरत होते. सदर दिवशी त्यांची नाईट ड्युटी होती. तेव्हा ते श्रीरामपुर बिटमध्ये गस्त घालीत असताना एक इसम डोक्यात हेलमेट घालुन रशमी हॉटेलजवळ दिसला होता. त्यांना रात्री २.०० वाजेच्या सुमारास विचारपुस केली

असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यामुळे त्यांना संशय आला की, सदर आरोपी चोरी करण्याच्या उद्देशाने रात्री हेलमेट घालुन फिरत आहे. आरोपीला त्यांनी नाव विचारले असता त्याने हर्षल दत्ता टाळीकोटे असे सांगितले. परंतु, त्याने तेथे असल्याचा उद्देश सांगितला नाही. त्यानंतर त्यांनी पोलीस स्टेशनला जावुन आरोपीविरुद्ध फिर्याद दिली. त्यांना फिर्याद व प्रथम छापील खबर अहवाल दाखविला असता त्यावर त्यांची सही असल्याचे व त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे त्यांनी मान्य केले. त्यास ***निशाणी क्रमांक–पी.१/पी.डब्ल्यु–२ व पी.२/पी.डब्ल्यु–२*** देण्यात आला आहे.

८. आरोपीतर्फे विधीज्ञांनी घेतलेल्या उलटतपासामध्ये सदर साक्षीदाराने हे मान्य केले आहे की, घटनेच्या दिवशी ते रात्र पाळत गस्तीवर असल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा त्यांनी तपासीक अधिकारी यांना दिला नव्हता. त्यांनी हे मान्य केले आहे की, त्यांनी स्टेशन डायरीच्या नोंदची प्रत प्रस्तुत प्रकरणात दाखल केलेली नाही. तसेच, त्यांनी स्पष्टपणे मान्य केले आहे की, त्यांनी आरोपीची अंग झडती घेतली नाही व आरोपीच्या ताब्यातुन कोणतीही आक्षेपार्ह वस्तु मिळून आली नाही. याव्यतिरिक्त विचारण्यात आलेल्या सर्व प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तरे दिली आहेत. साक्षीदार क्रं.२ यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता दिसून येते की, आरोपी घटनास्थळावर रात्री मिळून आल्याचे त्यांनी कथन केले आहे. परंतु, आरोपीच्या ताब्यात कोणतेही आक्षेपार्ह वस्तू मिळून आली नाही हे त्यांनी मान्य केलेले आहे.

९. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक–१ श्री.धम्मदिप बंडु सुर्यवंशी यांनी त्यांच्या

पुराव्यामध्ये असे कथन केले आहे की, दिनांक ०८.०८.२०२४ रोजी पोलीसांनी त्यांना पंचनामा करण्याकरिता कोठेही बोलाविले नाही. तसेच, त्यांच्यासमक्ष कोणतीही कारवाई केली नाही. त्यांना घटनास्थळ पंचनामा दाखविला असता त्यावर केवळ त्यांची सही असल्याचे त्यांनी मान्य केले. परंतु, त्यातील मजकुर त्यांना माहिती नसल्याचे त्यांनी कथन केले आहे. त्यांच्या सहीस ***निशाणी क्रमांक–पी.१/पी.डब्ल्यु–१*** देण्यात आला आहे. पंच साक्षीदार क्रमांक–१ यांनी अभियोगपक्षास सहकार्य केले नाही. त्यामुळे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांना भारतीय पुरावा कायदा, १८७२ चे कलम १५४ अन्वये उपरोक्त साक्षीदारास उलटतपासादरम्यान विचारता येतील असे 'सूचक प्रश्न' विचारण्यास परवानगी देण्यात आली. उलटतपासादरम्यान पंच साक्षीदार यांनी स्पष्टपणे नाकारले की, आरोपी रश्मी हॉटेलसमोर संशयास्पद स्थितीत हेलमेट घालुन बसलेला होता. तसेच, त्यांनी नाकारले की, पोलीसांनी त्यांच्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला. याव्यतिरिक्त अभियोगपक्षास उपरोक्त पंच साक्षीदार यांच्या साक्षीमधील आरोपीवरील दोषारोप सिद्ध होईल असे काहीही निष्पन्न करता आले नाही. त्यामुळे उपरोक्त पंच साक्षीदार यांची साक्ष अभियोगपक्षास आरोपीवरील दोषारोप सिद्ध करण्याकरिता उपयुक्त ठरत नाही.

**१०.** आरोपीविरुद्धचा गुन्हा सिद्ध करण्यासाठी अभियोगपक्षास हे सिद्ध करणे आवश्यक आहे की,

**अ.** आरोपी हा सुर्यास्तानंतर ते सुर्योदया होईपर्यंत या कालावधीमध्ये घरफोडी

करण्याच्या उद्देशाने डोक्यात हेलमेट घालुन संशयास्पद स्थितीत फिरताना दिसून आला.

११. अभिलेखावरील नोंदविण्यात आलेल्या पुराव्याचे बारकाईने अवलोकन केले असता, असे निदर्शनास येते की, प्रस्तूत प्रकरणात अभियोगपक्ष हा साक्षीदार क्रमांक–२ फिर्यादी आकाश बाभुळकर यांच्या पुराव्यावर विसंबून असून आकाश यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान अभियोगपक्षाच्या कथनांशी सुसंगत असा पुरावा दिला असून प्रस्तूत साक्षीदाराच्या पुराव्याद्वारे घटनेदिवशी ते पॅट्रोलिंग कामी असताना आरोपी हा त्यांना संशयीतरित्या आढळून आला. परंतु, आरोपीच्या ताब्यात आक्षेपार्ह वस्तु मिळून आली नाही. तसेच, आरोपी घटनास्थळावर डोक्यात हेलमेट घालून बसलेला दिसल्याने पोलीसांनी सदर आरोपीची चौकशी केल्याचे दिसून येते. परंतु, केवळ सदर व्यक्तीने डोक्यात हेलमेट घातल्याने तो स्वतःचे अस्तीत्व लपवून घटनास्थळावर बसलेला होता हा निष्कर्ष काढणे योग्य नाही. आरोपी दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने अस्तीत्व लपवून बसला होता व तयारीत होता याबाबत असा कुठलाही समाधानकारक पुरावा अभिलेखावर नाही. तसेच, घटनास्थळ पंच साक्षीदार क्रं.२ धम्मदिप याने देखील फिर्यादीला पुरक साक्ष दिलेली नाही.

१२. तसेच, या ठिकाणी ही बाब देखील निदर्शनास येते की, आरोपी हा घटनेच्यादिवशी कुठल्याही भरवस्तीमध्ये आढळून आला नसून तो हॉटेलजवळ बसून असताना मिळून आलेला आहे. या ठिकाणी ही बाब देखील नमूद करणे आवश्यक आहे की, आरोपी हा

चोरी अथवा घरफोडीसारखे गुन्हे करतो व तो सराईत गुन्हेगार आहे याबाबत अभियोगपक्षातर्फे कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर सादर केलेला नाही. वरील सर्व विवेचनावरुन असे निदर्शनास येते की, प्रस्तूत प्रकरणी अभियोगपक्षाने आणलेला पुराव्याद्वारे आरोपी विरुद्धचा गुन्हा निसंशयीतरित्या सिद्ध होवू शकला नाही.

**१३.** अभियोगपक्षाने आणलेला पुर्ण पुरावा पाहता, अभियोगपक्षाने आरोपीविरुद्ध ठेवलेला दोषारोप पुर्णपणे सिद्ध होत नाही. म्हणुनच महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १२२ अन्वये चे घटक सिद्ध होत नाहीत. सबब, मी ***मुद्दा क्रमांक–१*** चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र.२ करीता –**

**१४.** मुद्दे क्र.१ च्या नकारार्थी निष्कर्षावरून असे दिसुन येते की, अभियोगपक्ष हा आरोपीविरुद्धचा गुन्हा निसंशयीतरित्या सिद्ध करण्यास अयशस्वी ठरला आहे. त्यामुळे, आरोपी हा निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. अशा प्रकारे मी ***मुद्दा क्रमांक–२*** च्या उत्तरात खालील आदेश पारीत करत आहे –

| –: **आदेश** :– | |
|---|---|
| १. | आरोपी **हर्षद दत्ता टाळीकोटे** यांना महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १२२ च्या गुन्ह्यातून भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम २८१ नुसार निर्दोष मुक्त करण्यात येते. |
| २. | आरोपीचे वैयक्तिक जातमुचलका व जामीन कदबा रद्द करण्यात येत आहे. |

| | |
|---|---|
| ३. | आरोपी यांनी भारतीय नागारिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१ अन्वये वरिष्ठ न्यायालयात अपिल अथवा इतर अर्ज दाखल झाल्यास हजर राहणेसाठी म्हणुन प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/–(रुपये पंधरा हजार मात्र) चे वैयक्तीक बंधपत्र व जामीनपात्र दाखल करावे. सदर बंधपत्र व जामीनपत्राची मुदत ६ महिने राहिल. |
| ४. | **(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला).** |

**Sd/–**

दि.१८.०६.२०२६

**(श्रीमती व्ही.डी.बिरहारी)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पुसद.
(न्यायालय क्र.२)